Vol II Issue VI Dec 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 6, Dec. 2012
ISSN:-2231-5063 Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# विदर्भातील नक्षलवादी चळवळीचे अध्ययन

**प्रमोदकुमार के. नंदेश्वर**

श्री. बी.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय,
रिसोड जि. वाशिम.

**प्रस्तावना :—**

नक्षलवाद ही देशासमोरीलच नव्हेतर संपूर्ण जगासमोरील एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले.देशाची आणि देशातील नाकरीकांची गुलामगीरीतून मुक्तता झाली परंतू स्वच्छंद जिवन जगण्याचे स्वप्न पाहणा—या जनतेची नक्षलवाद्यांच्या दहशतीने झोप उडाली. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व नागरीकांना सुखी, आनंदी, स्वच्छंद जिवन जगता यावे म्हणुन जगातील विविध घटनांचा अभ्यास करून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्वा वर आधारलेली लोकशाही निर्माण केली व सर्व नागरीकांना जिवन जगण्याचा मुलभूत अधिकार प्रदान करण्यात आला. भारतात सुरूवाती पासूनच शांततेचा भंग करून अशांतता पसरविण्याचे बेकायदेशीर कृत्य नक्षलवादी संघटनेने केले त्यामुळे स्वातंत्र्याची गोड फळे चाखणा—या नागरीकांना पछाडले. राज्य, समाज आणि देशात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे या तिन्ही घटकांच्या विकासात फार मोठे अडथळे निर्माण झालेत. आधुनिक समाज व्यवस्थेत दहशतवाद व नक्षलवाद या दोन्ही संकलपना ऐकाच अर्थाने वापरण्यात येतात परंतु दहशतवाद हा राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर असतो तर राज्य व सामाजिक स्तरावर नक्षलवाद जोपासला जातो.

प्रस्तुत संशोधनातून नक्षलवाद या समस्येच्या उगमस्थानाचा वेध घेवून त्यांचा आदिवासी जनजातीवर झालेल्या परिणामांचे विवेचन करण्यात आले आहे.

**संशोधनाचा उद्देश :—**

या शोध पत्राचा उद्देश खालील प्रमाणे आहे.
1) नक्षलवादी चळवळीच्या उगमस्थानाचे अध्ययन करणे.
2) नक्षलवादी चळवळीच्या उद्दीष्टांचे अध्ययन करणे.
3) नक्षलवादी चळवळी पूर्व विदर्भात वाढीच्या कारणांचा शोध घेणे.
4) नक्षलवादाच्या आदीवाशी जमातीच्या जीवनमानावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती :—**

या संशोधन समस्येच्या अध्ययनाकरीता दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. तथ्यांच्या संकलना करीता इंटरनेट, मासीके, संदर्भग्रंथ इ. दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे. या दुय्यम साधानांच्या अध्ययानातुन तथ्य संकलीत करून त्याचे विवेचन करण्यात आले आहे.

**नक्षलवादाचा अर्थ :—** ''नक्षलवाद म्हणजे शस्त्राच्या बळावर हिंसक मार्गाचा वापर करून समाजात भितीचे वातावरण निर्माण करून आपले ध्येय साध्य करणारी संघटना होय''

**जॉन रॉल च्यामते** — राजकीय उदिष्ठ्ये प्राप्त करण्यासाठी अवैधानिक मार्ग अवलंबणारी आणि हिंसात्मक कार्य करणारी संस्था म्हणजे नक्षलवाद होय.

**नक्षलवादाची भूमिका :—**

25 मे 1967 मध्ये पश्चिम बंगाल मधील दार्जिलिंग नक्षलवाडी या छोट्याशा गावातून 'नक्षलवाद' शब्दाची उत्पत्ती झाली. जेथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे उग्रवादी नेते चारू मुजूमदार, कानू सन्याल व टी. नागीरेड्डी यांनी कम्युनिस्ट क्रांतीकारांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले जे आंदोलन सामाजिक विषमता, जमिनीचे असमान वाटप, जमीनदारांचे सामंती शोषण अर्थात जुलूम, अन्याय यांच्या विरोधात होते. तसेच योग्य रोजगाराच्या मागणीसाठी ऐतिहासिक शेतकरी आंदोलन किंवा चळवळ निर्माण झाले ज्यास आपण आज नक्षलवादी आंदोलन या नावाने ओळखतो. चारू मुजूमदार हा चीनच्या माओवादी विचारांचा समर्थक होता म्हणून त्याने भारतातील पददलीत तसेच शोषित लोकांना एकत्रित करून क्रांतीकारी आंदोलनास जन्म दिला. त्याच्या या नक्षलवादी आंदोलनाला त्याने आठ ऐतिहासिक दस्ताऐवजामध्ये लिपीबध्द केले ज्यास नक्षलवादी विचारधारांचा मुख्य ग्रंथ समजला जातो. त्याचा परिपाक म्हणून सन 1969 मध्ये औपचारीक रूपाने कम्यनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचा (मार्क्सवादी, लेनिनवादी) जन्म झाला. नंतर सदरील नक्षलवादी गटाचे माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर (एम.सी.सी) तसेच पिपल्स वॉर ग्रुप (पी.डब्ल्यु.जी.) मध्ये विभाजन झाले. 1998 च्या दशकात नक्षलवादी आंदोलन जवळपास 30 छोट्या छोट्या समुहात विभाजीत झाले. सन 2004

मध्ये पुन्हा हे समुह एम.सी.सी. व पी. डब्ल्यु. जी. मध्ये विलीन झाले.

सदरील नक्षलवादी आंदोलनाचे सकारात्मक पडसाद असे पडले की गरीब, दलित, शोषित, पीडीत यांच्यात चेतना जागृत झाली, जमीनदारी प्रथा नष्ट झाली. भूमीहीनांना जमिनीचे हक्क मिळाले समाजातील वाईट प्रथांवर अंकुश लावल्या गेला. एकुणच समाजातील दुर्लक्षित, पीडीत लोकांना न्याय मिळाला. परंतु वर्तमान स्थितीत नक्षलवादी आंदोलनाचे स्वरूप हे मूळ नक्षलवाडी आंदोलनाच्या विचारधारेला मूठमाती देणारे ठरले असून राज्य व समाजामध्ये विघातक व हिंसक कृत्यांचा वापर करून समाजजीवन दूषित होतांना दिसते. नक्षलवादी ही आधुनिक काळात केवळ व्यक्ती किंवा समाज आणि देशापुरतीच समस्या राहिली नसून तिचे स्वरूप हे व्यापक झाले आहे.

**नीलवादीस्वरूप :–**

जवळ जवळ 1951 पासून तर आज पर्यंत छोट्या मोठ्या दहशतवादी कार्यवाह्यांना भारताला तोंड द्यावे लागले. मिझोराम – 1966, मनिपूर – 1976, त्रिपुरा – 1980, तर 1980 नंतर आसाम, पंजाब –1981 व 1992 जम्मू काश्मिर–1988, आसाम, तामीळनाडू, केरळ व अन्य राज्यांना नक्षलवाद्यांच्या कार्यवाहींचा सामना करणे भाग पडले. आता अनेक राज्यात या संघटनेचे लोन पसरले आहे. महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशाच्या सिमावर्ती भागात तसेच झारखंड मध्ये नक्षलवादी कार्यवाही आज जोरात सुरू आहेत. तसेच मध्यप्रदेश इ. राज्याच्या सिमेवर नक्षलवाद्यांचा उपद्रव सुरू असुन हे नक्षलवादी महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदीया, भंडारा, चंद्रपुर, तसेच यवतमाळ जिल्ह्याच्या सिमेवरील किनवटच्या काही भागात वावरत आहेत. आता पर्यंत नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात हजारो लोक मृत्युमुखी पडले असुन या वर्षात राज्यात अनेक अधिकारी व कर्मचारी मृत्यु पावलेत. त्यामळे हे नक्षलवादी कुठे मानवी बॉम्ब हल्ले तर सुरुंग पेटवून देवून पोलीसांच्या गाड्या उडवून देणे, जाळपोळ करणे तर कोणत्या ठिकाणी दहशतवाद निर्माण करून समाजातील सामान्य नागरीकांचे जनजिवन विस्कळीत करण्याचे काम करतांना दिसुन येतात.

**नक्षलवादी संघटनेचे ध्येय –**

1) नागरीकांचे जगजिवन विस्कळीत करून समाजात असुरक्षीततेचे वातावरण निर्माण करणे.
2) जनतेत धास्ती, भिती किंवा दहशतीचे वातावरण निर्माण करणे.
3) आपल्या बेकायदेशीर मागण्याचा पूर्ण करून घेण्यासाठी सरकारवर दबाव आणणे, त्यासाठी हिंसाचारी मार्गचा वापर करणे.
4) सरकारला प्रशासकीय कार्य करण्यास हतबल करणे, व आपली शक्ती प्रदर्शीत करणे
5) राष्ट्राच्या तरूणांना चळवळीत समाविष्ठ करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

**नक्षलवादी संघटेने कार्य –**

1) संपूर्ण देशातील एकता, एकात्मतेला धोका निर्माण करून देशात शांतता, सुरक्षितता भंग करणे
2) नागरीकांच्या मुलभूत स्वतंत्र्याला धोका निर्माण करणे.
3) सैनीकी छावण्यावर हल्ले करणे, सरकारला धमक्या देणे.
4) देशातील महत्वपूर्ण नागरीकांना ओलीस ठेवणे व अपहरण करणे
5) ठिकठिकाणी लुटमार, हिंसाचार, गोळीबार, पोलिस चकमक, इ. आक्रमण कार्यवाह्या करणे.

आज ही देशात नक्षलवादी हल्ले होत असल्यामुळे लोकांना जिवन जगणे कठीण झाले आहे. कधी बिहार मध्ये तर कधी आसाम मध्ये कार्यवाही, कधी महाराष्ट्रातील गडचिरोलीत सुरूंग स्फोट, निवडणुकीचे बुत काबीज करणे तर कधी रेल्वे वर बेछुट गोळीबार, अशा अनेक दहशतवादी कृते नक्षलवादी करत आहेत. त्याला प्रतीबंध करण्यासाठी सरकारने प्रतीबंध स्थान बध्दता, पोटा, मोक्का व बरेच कायदे ही केले आहेत परंतू नक्षलवाद्यांवर पुर्णपणे नियंत्रण ठेवणे किंवा तो संपुष्टात आणने सरकारला शक्य झाले नाही. याचे चिंतन करण्याची गरज आहे.

**नक्षलवादी चळवळीचा पूर्व विदर्भात प्रदेश :–**

महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया व भंडारा या जिल्ह्यात नक्षलवादाचा प्रभाव असलेला दिसुन येतो. इ.स. 1978 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सिरोंचा या भागाचे आंध्रप्रदेशातील सिमावर्ती भागातुन प्रवेश करून सर्वेक्षणाचे काळात नक्षलवाद्यांच्या एका गटाने केले. इ.स . 1979 मध्ये आंध्रप्रदेशातील तेलंगना प्रदेशातून पाच नक्षलवादी गट आपल्या सहका–या सोबत सिरोंचा भागात सर्वेक्षणासाठी आले. त्यांच्या पाहणीतून त्यांना असे निदर्शनास आले की, येथिल शेतमजुर व कामगाराला अत्यंत कमी मजुरी देवून त्यांचे शोषण केल्या जाते. त्यामुळे त्यांचे राहणीमान अगदी हलाखीचे आहे. या आदीवासींच्या मजुरीत वाढ करून दिली तर यांच्यावर आपला प्रभाव व सहानुभूती निर्माण होईल व या क्षेत्रावर आपले नियंत्रण प्रस्थापीत होईल. या भावनेतुन त्यांनी आंदोलनास सुरूवात केली.

चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात आदीवासींच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन हे तेंदुपत्ता व बांबु संकलन हे झाले. तेंदुपत्ता व बांबु संकलनाच्या कामात व्यापारी व कंत्राटदार त्या वर्गाकडून कमी दरात आदीवासींकडून काम करून घेतले जाते व त्यांना शासनाने निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कमी दराने मजुरी दिली जाते. याची जाणीव आदीवासी अज्ञानमुळे नव्हती परंतु सुरूवातीच्या काळात नक्षलवाद्यांनी मजुरीचे हे दर वाढवून मिळण्यासाठी आंदोलने करून आदीवासीना वाढीव मजुरीचे दर मिळवून देण्यात यशस्वी झाले. त्यानंतर निरंतर त्यांनी हे दर वाढवून देण्यासाठी कंत्राटदार व व्यापा–यांवर दबाव वाढविला. यातुन नक्षलवाद्यांचा प्रभाव पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया या जिल्ह्यात निर्माणा झाला.

पूर्व विदर्भात स्थानीक लोकांच्या अनेक समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी राजकारणी अपयशी ठरले आहेत. राजकारणी लोक फक्त निवडणुकीतील आश्वासना व्यतिरिक्त काहीच देत नाही. उलटपक्षी नक्षलवाद्यांनी आदीवसींच्या समस्या जाणुन घेवून त्यांना त्यापासून मुक्तीचे आश्वासन दिले व काही अंशी मजुरीच्या दरात वाढ करून दिल्यामुळे आदीवासींचा नक्षलवादीवर विश्वास बसला यातुन पूर्व विदर्भात नक्षलवादी चळवळ फोफावण्यास वावा मिळाला.

नक्षलवादाचा आदीवासी जीवनावर प्रभाव

नक्षल चळवळीने आदिवासींना भाकरीची चतकोर मिळवून दिली. परंतू या मोबदल्यात त्यांना मात्र कायमची घुसमटच मिळालेली आहे. शासन नक्षलवादी यांच्यात आदिवासी पुरता भरडल्या जात आहे. दोन्ही बाजुला बंदुका चालविणारे आदीवासी आणि मरणारेही आदिवासीच. कुरक्षेत्रातील महाभारताप्रमाणे यात मात्र थोडी तफावत आहे. या रणक्षेत्रात एका बाजुला शासन व त्याचे स्टेट आहे. दुस–या बाजुला नक्षलवादी आहेत आणि मध्यभागात आदीवासी. दोन्ही कडून त्यांना कोंडीत पकडल्या जात आहे. आणि मनस्वी बळी घेतले जात आहेत. जात्यात दाणे भरडल्या जावे तशी ही रचना मानवी कृत आणि नागर समाजाची वाटते. अनेकानेक अपेष्टा सोसूनही आदीम जीवंत आहेत ही विडंबणा वाढत असावी त्यामुळेच प्रशासन व नक्षली यांचे बळी आदवासी ठरत आहेत. पूर्व विदर्भात गेल्या विस वर्षात कोणतीही चौकशी न करता तुरूंगात डांबून ठेवलेल्या लोकांची संख्या शेकडोनी आहे. ज्याचे कुठलेही देणे घेणे या वर्गाशी नाही त्या अनेकांना न्यायालयाचे खेटे मारावी लागत आहेत. चौकशीच्या नावाखाली ओलीस धरल्या जात आहेत. या घटना आदिम वंशाला संपुष्टात आणणा–या वाटातात. विकासांच्या नावावर त्यांना

हुसकावून लावण्याचे प्रकार घडत आहेत. त्यांची वनसंपदा भांडवली वर्गाना परस्पर दिल्या जात आहे. नागर समाजाला समृध्द करण्याच्या नावाखाली आदिम वंश छेद सुरू आहे. छत्तीसगढ मधिल सलवा जुडूम चा प्रयोगही याच
धोरणातील एक भाग आहे. त्यामुळेच नक्षलवाद नस्लवाद ठरत असल्याचे भासते. नागर वंशाच्या श्रेष्ठत्वाच्या अहंकारातच याचे बिजारोपन आहे. सामाजिक स्तरीकरणाचा अभिशाप असलेल्या या देशात नक्षली गटांनाही त्याची बाधा झाली. या बाबत अशीही वदंता आहे की नक्षल्यातील सवर्ग नेतृत्व सर्वहारांचे प्रश्न केवळ स्वार्थासाठी सोडविण्यास इच्छुक नाही. याचाच अर्थ नक्षल्यातील संवर्ग नेतृत्वांना आदिमांच्या उन्नतीशी काही संबंध नाही. ही बाब स्तरीकृत गटामुळे बाहेर आल्याने नक्षल्यातील नस्लवाद पुरता बाहेर आलेला आढळतो. शासन स्तरावूरन नस्लवाद जोपासल्या जातात हे खरेच परंतु या प्रश्नाचे निराकरण सांसदीय मार्गानेच होणे हितावह ठरते. त्यामुळे अनिश्चिेने का होईना शासन मार्गातून तोडगा गाढणे आवश्यक ठरते. शासनाला प्रामाणिकपणे या प्रश्नांची तड लावावयाची असल्यास आदिमाप्रती पं. नेहरूच्या दृष्टीकोनाला कठोरपणे अंमलात आणावे लागेल.

अदिम विकासाच्या संदर्भात तीन दृष्टीकोन मांडल्या गेलेत. एका सामीत्वीकरणाचा, दुसरा अलगत्वाचा आणि तिसरा त्यांच्यात विश्वास निर्माण करून त्यांच्याचकडून विकास करून घेण्याचा. भारतातील एकदंशाश लोकसंख्येला आपलेसे करावयाचे असल्यास प्रथम आपल्याप्रती त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याची गरज असल्याचे पं. नेहरूनी प्रतिपादन केले होते. त्याकरीता त्यांच्यावर आपली संस्कृती, माणसे, प्रशासन, शासन न लादता त्यांच्या संस्कृतीशी सांगड घालून विकासात येण्याचे वातावरण निर्माण करण्यावर पं. नेहरूचा भर होता. शिक्षक, तंत्रज्ञ, विधी सल्लागार, ग्रामसेवक, पटवारी, डॉक्टर, नर्स, विभीन्न सेवेकरी त्यांच्यातलेच त्यांच्यासाठी असावे म्हणजे तेच लोक समुदायात निष्ठा निर्माण करू शकतील, ते स्वतःच्या लोकांचे पाशवी शोषण करणार नाही. परिणामी सर्व प्रकारच्या प्रवाहात येतील आणि भारताला त्याचा मोठा लाभ मिळेल. शासनाने स्टेट चा वापर न करता या गोष्टींना उत्तेजन देऊन कृतीशील व्हायला हवे. उत्पादन, नियंत्रण, वितरणावर त्यांचा हक्क मान्य केला जावा. निस्तार हक्क स्विकारल्या जावेत. मेंढालेखाचा आमच्या गावात आमचेच सरकार या योजनेला निःस्वार्थ हेतुने नक्षली प्रभावी क्षेत्रात लागु करण्याचे वातावरण निर्माण केल्यास हे मळभट दूर होईल अन्यथा नक्षली चळवळ अस्ताला न जाता ती शासनासमोर आव्हान म्हणूनच उभी राहील.

**उपाय**

1) नक्षलवाद्यांचा सामाना करण्यासाठी आधुनिक शस्त्रनिशी विशेष प्रशिक्षण पोलीसांना देणे आवश्यक आहे.

2) नक्षलवादी जेथे वास्तव्य करतात त्या जंगलाची बोलीभाषा आत्मसात करून अत्याधुनिक स्फोटकांची माहिती पोलीसांना करून देणे गरजेचे आहे.

3) युध्द शस्त्रांचे धडे आणि हल्ले करण्याची पध्दती कोणती या बाबतचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

4) शासन, प्रशासन, जनता, लष्करी व्यवस्थे विषयी गोपनिय माहिती नक्षल वाद्यापर्यंत जनतेव्दारे त्यांना मिळू नये या बाबत खबरदारी घेणे गरजेचे आहे.

5) जनतेचे आर्थिक शोषण होणार नाही याची शासनाने दखल घ्यावी.

6) नागरीकांच्या हक्कांची पायमल्ली होता कामा नये.

7) नक्षलग्रस्त भागात राहणा–या तरूणांना काम किंवा नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात. या शिवाय लोकांना मुलभूत हक्कांची हमी मिळाली, त्यांच्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक विषमतेची दरी कमी झाली, नागरीकांना पक्षपाती वागणुक मिळणार नाही याची त्यांना शासनाकडून हमी मिळाली तरच नक्षलवादी कमी करता येईल व राज्य आणि समाजाला आपला विकास साधता येईल.

**उपसंहार :–**

नक्षलवाद्यांबाबत नेहमीच उभा ठाकणारा प्रश्न म्हणजे नक्षलवाद नस्लवाद चे प्रतिक आहे काय? भारतात गेल्या 5 दशकात या वादाने आपली पाळेमुळे जंगल प्रदेशासोबतच नागर समाजात रोवण्यात यशस्वी ठरलेले आहे. त्यामुळे शासन ही व्यवस्था संपुष्टात आणू शकले नाहीत काय ? सर्वहारा वर्गाचे शोषणाचे प्रश्न संपुष्टात आणण्यास चळवळीला यश मिळाले काय ? या व याशिवाय अनेकानेक प्रश्नांची मनोरे नक्षली चळवळीने निर्माण केलेली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शासन यंत्रणा, तिची उद्दीष्टे, ध्येय, कुठे आहेत हा प्रश्न निर्माण होतो. स्वातंत्र्यायाचा सूर्य सर्व हारांच्या वस्तीत झिरपू का शकला नाही? हा प्रश्न उपस्थित होतो. यातूनच नक्षलवाद निर्माण झााला आहे हे दिसुन येते. नक्षलवाद नष्ट करण्यासाठी आदिवासींचे सामाजिक, आर्थिक, राजकीय शोषण थांबवून त्यांचा राजकीय, आर्थिक व सामाजिक विकास करणे गरजेचे आहे. त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे अगत्याचे आहे. तसेच वर उल्लेखीत उपायांची यशस्वीरित्या अमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्याशिवाय ही समस्य नष्ट होवू शकत नाही.

**संदर्भ –**

1) दै. लोकमत

2) राज्यशास्त्र – लेखक शेख हाशम आणि गवई.

3) सी. वनजा, दंडकारण्यातील समांतर सरकार, 2006, नागपूर, पृ.क. 1

4) लटारी कवडू मडावी, पताना, नागपूर, 2004, पृ.क. 97

5) डॉ. गोविंद गारे, नक्षलवादी आणि आदिवासी, 2003, पूणे. पृ. क. 9

6) माधव बंडू मोरे, आदिवासी बोलू लागला, पूर्ण पृ.क. 4

7) देवेन्द्र गावंडे, पोलिसांच्या छळामुळे तिन तरूण नक्षलवादी चळवळीत, दैनिक लोकसत्ता, नागपूर, 10 डिसेंबर 2009.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net